ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An Peer Reviewed International Journal

June - 2020
Vol. I No. 13

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

## About Excel Publication

**The Philosophy:**

Excel's International Journal of Humanities and Social Science (EIJHSS) is an open access, peer-reviewed and refereed journal published by Excel Publication House India. The main objective of EIJHSS is to provide an intellectual platform for the international and Indian scholars. EIJHSS aims to promote interdisciplinary studies in humanities and social science.

Submissions should indicate an understanding of the relevant literature and the contribution of the submissions to this body of research. Empirical articles should have an appropriate methodology and be able to relate their findings to the existing literature. Methodological articles must attempt to show how they further existing theory.

The review process: The review process followed by Excel Journal is systematic and thorough. Articles submitted to the journal are initially screened by the editor for relevance and overall quality as judged by the presentation of concepts, methodology and findings. Inappropriate or weak submissions are not forwarded for a formal review. Those considered appropriate are submitted to a double blind review process.

Potential contributors: Every research-oriented individual and institution, and every research student, faculty working anywhere in the world is invited to explore fruitful connections with Excel Publication.

# Contents


1) **An overview of Maharashtra Assembly Elections : Through the Years**
Mr. Madhukar Laxman Hiwale — 01

2) **A Study of Foreign Relations of India: BRICS and India, BRICS in Africa**
Mr. Madhukar Laxman Hiwale — 07

3) **Agricultural Finance through commercial Banks in India**
Mr. Sayyad Abdul Aziz Maheboobsab — 17

4) **MGNREGA: A Rural Lifeline of India**
Mr. Sayyad Abdul Aziz Maheboobsab — 22

5) **"World's Biggest Virus Lockdown Saves Life but Hurts Businesses"**
Hanumant C. Kambale — 28

6) **Multi-Media Approach to Teaching Urdu at Secondary School Level**
Dr. Najmus Saher, Dr. Khan Shahnaz Bano — 40

7) **"A study of effect of Online Learning on achievement of Science Subject of Xth Std students of Aurangabad city"**
Dr. Mirza Mahefooz Baig — 46

8) **"Impact of Todays Lifestyle on Type 2 Diabetes with special reference to Young People"**
Dr. Mohammed Bari, Jyotsna Ishwar Jadhav — 51

9) **Impact of Corona virus on Education in India**
Dr. Mohammed Abdul Raffey — 57

10) **The Autobiography of Malcolm X: The Journey from oppression to Liberation**
Dr. Syed Aleemuddin — 63

11) **Changing Scenario of Education System in Covid19 Pandemic**
Dr. Surekha Milind Kulkarni — 69

12) **भारतीय कररचना आणि अर्थसंकल्प एक सिंहावलोकन**
डॉ. अशोक कोरडे — 75

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist. Nanded


13) मौर्य काळापर्यंतची राजकोष भरणाची विविध माध्यमे : एक अभ्यास
प्रा.डॉ. सुनेवार किशन रामलू 84

14) कबीर के साहित्य मे लोकसंग्रह की भावना
प्रा.डॉ. उत्तम जाधव 93

15) डॉ. नेल्सन मंडेला : वर्णभेद संपविणारा युगपुरुष
प्रा. पोटभरे एस.डी. 99

16) بشرنواز کی غزل عروض کے آئینے میں
*ڈاکٹر اصفیہ ذکریا مدنی، **رعنا کوثر شیخ حسین 105

17) ہندوستانی ابتدائی تعلیم اور پانچ سالہ منصوبے
ڈاکٹر شیخ وسیم شیخ شبیر 109

18) جے پی سعید کا شعری اسلوب ''گلگشت'' کا جائزہ
نورالنساء بیگم بنت حافظ غلام محمود 116

19) صوفی شاعر : خواجہ میر درد
ڈاکٹر سیدہ فرحت نسرین 120

20) شاہ حسین نہری کی غزل گوئی
نعیم اختر سراج خان 124

21) طلبا کی ذہنی صحت اور تعلیمی حصولیابی
ڈاکٹر اشتاق ندیم خان 130

22) ڈاکٹر یوسف صابر بحیثیت خاکہ نگار
شیخ ہما کوثر بنت احمد علی 138

23) مولانا ابوالکلام آزاد ___ بحیثیت غزل گو
ڈاکٹر عقیلہ سید غوث 142

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

EXCEL'S INTERNATIONAL JOURNAL OF SOCIAL SCIENCE & HUMANITIES
*(An Peer Reviewed International Journal)* *ISSN 2277-7539 (Print)*
*Vol. I No.13 - June, 2020* *Impact Factor 5.631 (SJIF)*

# मौर्य काळापर्यंतची राजकोष भरणाची विविध माध्यमे : एक अभ्यास

* प्रा.डॉ. सुनेवार किशन रामलू

**प्रस्तावना :**

जगातील कुण्याही राज्याची स्थिरता व शक्ती ही त्याच्या राजकोषावरच अवलंबून असते राजकोष संपन्न असेल तर ते राज्य स्थिर मानले जाते आणि राजकोषात खडखडाट असेल तर ते राज्य दुर्बल मानले जाते. राजकोष हा त्या राज्याच्या प्राण मानला जातो. म्हणून कौटिल्याने आपल्या 'सप्तांग सिद्धांतात' कोष ला (राजकोष) विशेष महत्त्व दिले आहे. राजकोष दुर्बल असेल तर त्या राष्ट्रावर अनेक संकटे येतात आणि ते राष्ट्र संपूनही जाऊ शकते. राजाची सर्वच कर्तव्येही राजकोषावरच अवलंबून असतात. म्हणुन राजाचे कर्तव्यच मानले जाते की, त्याने आपल्या राजकोष नेहमी सुदृढ ठेवला पाहिजे.

राजा जनतेचे संरक्षण करतो म्हणून जनता त्याला कर देते आणि तो कर राजकोषात जमा केला जातो. पण राजाने जनतेकडून योग्यच कर वसूल केला पाहिजे. जनतेवर अधिक कराचा बोजा टाकता कामा नये. राजा आर्थिक समृद्धीत असो किंवा विपत्तीत असो त्याने जनतेकडून योग्यच कर वसूल केला पाहिजे.[१] कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र ग्रंथात म्हटले आहे की, 'राजाने अवेळी व अवाजवी कर वसुल करू नये. ते कच्चे फळ तोडल्याप्रमाणे हानिकारक होईल.'[२] अधक दुध प्राप्त करण्याच्या लालसेने दुभत्या जनावराचे स्तनच कापून घेवू नये तर मुंगी व मधमाशीप्रमाणे राजाने कर वसूली केली पाहिजे. अशीच करवसूली केली पाहिजे अशीच कर वसूली राजा आणि प्रजा ह्या दोघांच्या ही हिताची असते. अन्यतः अनेक प्रश्न उद्‌भवू शकतात.

सिंधू संस्कृतीकालीन कसलेच वाङ्मयीन साधन न सापडल्यामुळे तत्कालीन राजकोष भरणाची माध्यमे कोणती होती किंवा कराची माध्यमे कोणती होती. हे कांही स्पष्टपणे सांगता येत नाही. पण वैदिक

* इतिहास विभाग प्रमुख, देगलूर महाविद्यालय, देगलूर, ता. देगलूर, जि. नांदेड - ४३१७१७

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

काळातील कांहीशी राजकोष भरणाची माध्यमे सांगता येतात. वैदिक काळात आर्यांच्या टोळीप्रमुखांना टोळीतील लोक आपल्या इच्छेप्रमाणे आपल्या उत्पन्नाचा कांही भाग कर म्हणून भाग कर म्हणुन देत होते. त्यालाच 'बली' असे म्हणत होते. मॅकडोनाल्ड आणि किथ यांच्या मते, 'बली' हा वैदिक काळाच्या प्रारंभापासूनच एक नियमीत कर राहिला आहे तो जनतेला द्यावाच लागत होता. तो 'बली' कर त्याकाळात अन्नधान्यरुपात आणि पशुरुपात होता. तसेच आर्यांनी ज्यांना कुणाला पराभूत केले होते अशा पराभुतांकडुन भेट म्हणुन किंवा बली म्हणुन युद्धदंड वसूल केला होता.[३]

उत्तर वेदकाळात राज्यवयवस्था स्थिर झाल्या. त्यामुळे करव्यवस्थेतही बरीच सुधारणा झाली असे दिसते. या काळात करव्यवस्था ही राज्याचा प्रमुख अंग बनली होती. बली हा कर नियमीत वसूल केला जाऊ लागला होता.[४] याच काळात समाहर्ता (कर आकारणी करणारा), भागदुध (कर वसुल करणारा) अशा दोन व्यक्तींची राजा नेमणुक करीत होता. यातील भागदुध हा राजाचा प्रजेकडून येणारा कर धान्य किंवा वस्तू रूपात वसूल करीत होता तर समाहर्ता हा ते कर राजकोषात किंवा भांडारगृहात जमा करीत होता. यावरून स्पष्ट होते की तेंव्हापासूनच राजस्व विभगाची सुरूवात झाली असावी. लोक राजाला कर रूपात गाय, बैल, घोडे, धन इत्यादी देत होते. या काळात ब्राह्मण व क्षेत्रीय हे करमुक्त होते तर वैश्य आणि शूद्र यांच्याकडून करवसुली केली जात होती. वैश्य लोक कृषी, पशुपालन, व्यापार करीत होते तर शुद्र इतर अनेक उद्योग धंदे करीत होते. राजा त्यांच्याकडुन कराचा अधिक भाग वसूल करीत होता.[५]

प्राचीन भारतातील इ.स.पु. सहावे शतक म्हणजे व्यापार आणि वाणिज्य बाबतीतला समृद्धकाळ मानला जातो. त्यामुळे त्या काळात करप्रणालीचाही बराच विकास झालेला आपल्याला दिसतो. त्या काळातील धर्मशास्त्र आणि जातक कथांमध्ये तत्कालीन करांचा उल्लेख आहे की, 'चांगले राजे धर्मशास्त्रांनी सांगीतल्या नुसार कर वसुल करत होते. तर दुष्ट राजे नाना प्रकारचे अवैध कर वसुल करीत होते.' वैदिक काळाप्रमाणे या काळातही राजे लोक बली नावाचा कर वसल करीत होते. पण जातक कथांमध्ये म्हटले की, 'बली नावाचा कर म्हणजे एक अतिरिक्त व त्रासदायक कर होता.'[६] बौधायन धर्मसुत्र आणि वशिष्ठ धर्मसुत्रात म्हटले आहे की, राजाने प्रजेच्या सुरक्षेबद्दल प्रजेकडून त्यांच्या उत्पन्नाचा सहावा भाग (१/६) कराच्या रूपात वसुल करावे.[७] विष्णू स्मृतीनुसार राजा हा प्रजेच्या उत्पन्नाच्या सहाव्या भागाचाच अधिकारी आहे.[८] गौतम धर्मसुत्रानुसार राजा हा शेती उत्पन्नाचा सहावा, आठवा आणि दहावा भागही कर घेवू शकत होता. यावरुन स्पष्ट होते की त्याकाळात जमीनीची प्रतवारी ठरविली जात असावी आणि त्यानुसार कमी जासत प्राणात शेती कर वसु केला जात असावा. तसेच पशु व सुवर्ण विक्रीचा पाचवा, व्यापारी माल विक्रीचा विसावा, फळे,फुले, औषधी वनस्पती, मध, मांस आणि सरपणाच्या लाकूड विक्रीचा साठवा भाग कर म्हणून वसूल केला जात होता. शिल्पी आणि शरिरीक श्रम करणाऱ्या लोकांना महिन्यातून एक दिवसांची मजूरी कर म्हणून राजाला द्यावी लागत होती. किंवा त्याला एक दिवस सरकारला श्रम द्यावे लागत होते. ज्या समुद्री वस्तु आयात होत होत्या त्यावर दहावा भाग कर म्हणून

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded



घेतला जात होता.[९] इ.स.पु. सहाव्या शतकात विद्वाण, पुरोहीत, सन्यासी, विधवा, स्त्रिया, अपंग, विद्यार्थी इत्यादींना करमुक्त ठेवण्यात आले होते.[१०]

**मोर्यकालीन कर माध्यमे :**

मोर्यकालीन करव्यवस्थेविषयीची सविस्तर माहिती कौटिल्याच्या अर्थशास्त्रातून कळते. कौटिल्याने राजकोष वृद्धीचे अनेक कर प्रकार सांगीतले आहेत. कौटिल्याने म्हटले की, "प्रजेवर काळ आणि देश पाहुन कर आकारणी केली पाहिजे. प्रजेवर जाचक कर लादता कामा नये. प्रजा हा भरघोस उत्पादन करीत असेल तरच ती राजाचा कर देऊ शकेल म्हणून प्रजेला उत्पादन वाढवण्यासाठी प्रेरीत केले पाहिजे. प्रजा राजाला सहज कर देऊ शकेल एवढेच कर राजाने आकारले पाहिजे. राजाने अतिरिक्त कर आकारून प्रजेला निर्धन बनवता कामा नये. जसे माळी फुललेलीच फूले तोडतो. दुधवाला आपल्या गाई-म्हशींची निगाराखून, त्यांना गोंजारून दुध काढतो. तसेच राजाने सुद्धा प्रजेबाबत धोरण ठेवले पाहिजे तर प्रजा सुखी राहील आणि राजाचा राजकोष भरभरून राहील."[११] कौटिल्याने म्हटले की, राजाला साधारणतः प्रजेकडून त्यांच्या उत्पन्नाचा १/६ भागच कर म्हणून द्यायला पाहिजे. आणि नैसर्गिक आपत्तीच्या तिव्रतेनुसार त्याकाळात प्रजेला करात सुटही दिली पाहिजे. त्याने म्हटले की ग्रामप्रमुखाला गावांच्या भुमीचे तीन भागात विभाजन केले पाहिजे. आणि त्यानुसार कर आकारणी केली पाहिजे यावरून स्पष्ट होते की, जमीनीच्या उर्वरा शक्तीच्या आधारावरच कर वसूल केला जात होता. म्हणजे बागायत, जिरायत, तसेच कमी उर्वरा शक्ती असलेली जमीन असे तीन भाग केले जात असावे. मोर्यकालीन राजे कांही विशेष परिस्थितीत जमीन महसुलात सुटही देत होते. जसे लुंबीनी ही गौतम बुद्धाची जन्मभुमी होती. म्हणुन लुंबीनी परिसरातील लोकांना सम्राट अशोकाने १/८ एवढाच भुमीकर वसुल करण्याचे आदेश दिले होते. आणि त्या परिसरात नैसर्गीक आपत्ती आली तर प्रजेवरचा कर माफही करीत होते.[१२]

मोर्यकालीन जमीन महसुलबाबत अनेक इतिहासकारांनी वेगवेगळे प्रमाणही सांगीतले आहेत. मैगेस्थेनिसने म्हटले की, 'ते प्रमाण बहूतेक बागायत जमीनीवर असावे."[१४] एम.एच. गोपाल यांनी म्हटले की, 'मोर्यकाळात सामान्यतः १/६ एवढाच उत्पन्नाचा भाग भुमीकर म्हणुन वसुल केला जात होता.' पण ज्यांच्या जमीनी सिंचनाखाली आहेत त्यांच्याकडुन १/२, १/३, १/७, ह्या प्रमाणात जमीन महसूल घेतला जात होता.[१५]

कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र ग्रंथात राजकोष भरणाची अनेक कर माध्यमे सांगीतली आहेत आणि त्यांचे प्रामुख्याने दोन भागात विभाजन केले आहे. आणि त्या प्रत्येक भागात पुन्हा सात-सात घटक सांगीतले आहेत. त्या दोन भागांची माहिती पुढीलप्रमाणे -

२०५

ADAT VYAPAR ... EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded



१) शुल्क : नगरांच्या विविध मार्गांतून नगरात येणाऱ्या वस्तुंवर जो सिमा शुल्क लावला जातो. त्याला चुंगीकर किंवा 'शुल्क' म्हणतात.

२) पोतव : नगरातील व्यापाऱ्यांकडे जी वजने मापे असतात त्यांना प्रशासनाकडुन प्रमाणीत करून दिले जाते. ते प्रमाणीत करण्याचे शुल्क सरकारकडून घेतले जाते त्याला 'पोतव' म्हणतात.

३) दण्ड : विविध कारणांनी नगरातील नागरीकांवर किंवा व्यापाऱ्यांवर जो दण्ड आकारला जातो. तो 'दन्ड' होय.

४) नागरक : मौर्यकाळात तुरूंगात जे कैदी असतात त्यांच्याकडून विविध कामे किंवा वस्तुनिर्माण करून घेतले जातात त्यातून मिळणारे उत्पन्न म्हणजे 'नागरक' होय.

५) लक्षणाध्यक्ष : नगरांमध्ये जी चलनव्यवस्था असते. किंवा ज्या कांही टाकसाळी असतात त्यांच्यावर लक्षणाध्यक्ष हा अधिकारी नियंत्रण ठेवतो आणि त्यांच्याकडून कांही उत्पन्नाचा भाग वसूल करतो ती रक्कम होय.

६) मुद्रा : जेंव्हा बाहेरच्या गावच्या कुणीही नागरीक किंवा व्यापारी हा नगरात प्रवेश करतो. तेंव्हा त्याच्याकडून कांही रक्कम घेवून सरकारी पास दिला जातो. तर ती रक्कम म्हणजे 'मुद्रा' कर होय.

७) सुरा : मौर्यकालीन नगरांमध्ये जी कांही दारूची दुकाने होती. त्यांना चालविण्यासाठी जे कांही ठेके किंवा परवाने दिले जात होते. तेंव्हा त्यांच्याकडून कांही रक्कम घेतली जात होती त्याला 'सुरा' कर म्हणतात.

८) सुना : नगरांमध्ये मांस विक्रीची जी दुकाने असतात त्यांच्याकडून जो कर घेतला जातो त्यांना 'सुना' कर म्हणतात.

९) वाहिरकादेय : नगरांमध्ये जे अत्याधिक श्रीमंत लोक होते त्यांच्याकडुन मौर्य प्रशासन जे उत्पन्नकर घेत होते त्याला 'वाहिरकादेय' कर म्हणतात.

१०) सुत्र : नगरामध्ये कापड उद्योगातील सुतकताई करणारे जे कारागिर किंवा उद्योजक होते त्यांच्याकडून घेतल्या जाणाऱ्या करास 'सुत्र' म्हणतात.

११) द्वार : नगराच्या मुख्य प्रवेशद्वारातून जो कांही व्यापारी माल येत- जात होता त्यावर जो कर आकारला जात होता त्याला 'द्वार' म्हणतात.

१२) तैल : नगरात तेलबियांपासून तेल काढणारे जे तेली व्यावसाईक होते त्यांच्याकडून घेतल्या जाणाऱ्या करास 'तैल' म्हणतात.

१३) देवताध्यक्ष : नगरातील मंदिरांची व्यवस्था ठेवणारा किंवा मंदिरांच्या उत्पन्नावर देखरेख ठेवणारा देवताध्यक्ष हा अधिकारी होता. तो मंदिरांच्या उत्पन्नाचा कांही भाग राजकोषात जमा करीत होता

१४) धृत : नगरांमध्ये तुपाचा व्यवसाय करणारे जे लोक होते त्यांच्याकडुन 'धृत' नावाचा कर घेतला जात होता.

१५) वास्तुक : नगरातील जी घरे किंवा स्थावर मालमत्ता खरेदी-विक्री होत होती त्यावर सरकार द्वारा जो कर घेतला जात होता त्याला 'वास्तुक' म्हणतात.

DEGLOOR COLLEGE Dist. Nanded



**१६) मीठकर :** मीठाचे उत्पादन करणारे किंवा नगरात मीठाची विक्री करणारे जे व्यापारी होते त्यांच्याकडून 'मीठकर' घेतला जात होता.

**१७) द्युतकर :** नगरांमध्ये जे विविध प्रकारचे जुगार अड्डे चालत होते त्यांच्याकडूनही कर घेतला जात होता त्याला 'द्युत' कर म्हणतात.

**१८) सौवर्णीक कर :** सुवर्णालंकार किंवा सोन्याची खरेदी विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांकडून जो कर घेतला जात होता त्याला 'सौवर्णीक' कर म्हणतात.

**१९) वेश्याकर :** मौर्यकाळात नगरांमध्ये वेश्याव्यवसाय करणाऱ्या ज्या महिला होत्या त्यांच्याकडूनही सरकार 'वेश्याकर' घेत होते.

**२०) पण्यसंस्था कर :** मौर्यकाळात सरकारचा कांही व्यापारी मालावर एकाधिकार होता. तो व्यापारी माल सरकारच्याच पण्यसंस्थेकडून खरेदी-विक्री केली जात होता. त्यातून सरकारला जे उत्पन्न मिळत होते त्याला 'पण्यसंस्था' कर असे म्हणतात.

**२१) श्रेणी कर :** मौर्यकाळात विविध कारागीरांच्या आणि शिल्पींच्या श्रेणी संघटना होत्या त्यांच्याकडून सरकार श्रेणीकर घेत होते.[१६]

**ब) राष्ट्र :** मौर्य साम्राज्याअंतर्गत जी मांडलीक राज्ये होती. त्यांच्याकडूनही विविध कर रुपात संग्रहीत झालेले धन मौर्य राजांच्या राजकोषात जमा केले जात होते त्याला 'राष्ट्र' म्हणतात. त्या मांडलीक राज्यांचे घेतले जाणारे कर प्रकार खालील प्रमाणे -

**१) सिता :** मौर्यकाळात जी सरकारची भुमी होती. त्यावरही कर आकारला जात होता त्याला सिता म्हणतात. तो कर वसूल करण्याचे काय सिताध्यक्ष करीत होता व तो कर राजकोषात जमा केला जात होता.

**२) भाग :** शासकिय भुमीशिवाय इतर ज्या कांही शेतजमिनी होत्या. त्यावरही कर आकारला जात होता त्याला 'भाग' असे म्हणतात. त्या शेतजमिनीवर आकारला जाणार कर त्या शेतजमिनीच्या उर्वरा शक्तीवर आधारित आकारला जात होता.

**३) वर्तनी :** मौर्य साम्राज्यात जी कांही सडके किंवा व्यापारी मार्ग होते त्यावर 'वर्तनी' नावाचा कर आकारला जात होता.

**४) चोररज्जू :** जे कांही चोर अपराधी होते. त्यांना पकडून समज देवुन, कांही दन्ड घेवून सोडले जात होते. तो दन्ड म्हणजे 'चोररज्जू' होय.

**५) बली कर :** साम्राज्यातील धार्मिक स्थळे किवा तिर्थस्थाने यांचेकडून विशेष कर घेतला जात होता त्याला 'बली' कर म्हणतात. येथे बलीकराचे स्वरुप बदललेले दिसते.

**६) विवित कर :** नगरांच्या-ग्रामांच्या किंवा इतर ठिकाणी ज्या कांही गायरान जमिनी होत्या. त्यावर जी जनावरे चारवली जात होती. त्या जनावराच्या मालकांकडून घेतला जाणारा कर म्हणजे 'विवित' कर होय.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S ... COLLEGE ... Dist.Nashik



**७) कर:** मौर्य साम्राज्यात जी कांही सामंत मंडळी होती. त्यांच्याकडून भाग कर घेतला जात होता. त्या सामंतांना दरवर्षी आपल्या राज्याच्या राजकोषात तो कर जमा करावा लागत होता.

**८) पट्टन कर :** मौर्य साम्राज्यात जेथे बाजार लागतो अशा बाजारु खेड्यातून वसुल केला जाणारा कर म्हणजे 'पट्टन' कर होय.

**९) वणिक कर :** खेड्यातील व्यापार, व्यावसाईकांकडूनही 'वणिक' कर नावाचा कर वसूल केला जात होता.

**१०) नाव कर :** एखाद्या ठिकाणी एका गावातून दुसऱ्या गावांना जाण्यासाठी नावेने नदी पार करावी लागते. तेंव्हा नावाडी लाक व्यापाऱ्यांकडून किंवा प्रवाशांकडून पैसे घेतो. तर त्या नाविकांना सरकारला कर द्यावा लागत होता. त्याला 'नाव' कर म्हणतात.

**११) नदीपाल कर :** जर एखाद्या नदीवर सरकारद्वारा पूल बांधला असेल आणि कुणीही व्यापारी किंव ा प्रवाशी त्या पुलावरुन जात असेल तर त्याला पूल वापरण्याबाबतचा कर द्यावा लागत होता त्याला 'नदीपाल' कर म्हणतात.[१७]

**क) खनि :** मौर्यकाळात ज्या कांही जमिनीवरील खाणी आणि समुद्री खाणी होत्या. त्यातून सोने, चांदी, हिरा, मोती, मणी, शंख, लोखंडी, मीठ इ. काढले जात होते. अनेक मौल्यवान रत्ने, खडे तया खाणीतून काढले जात होते. ह्या खाणउद्योगावर संपूर्णता सरकारचा एकाधिकार होता त्या खाणउद्योगातून निघणारे उत्पादन भरघोस होते. त्यांचा परदेशात निर्यात व्यापार होत होता. त्यातूनही सरकारला भरपूर उत्पन्न प्राप्त होत होते.[१८]

**ड) सेतू :** बागायती शेती ज्यामध्ये भाजीपाल्याचे उत्पन्न घेतले जाते तसेच मुळा, गाजर, कंदमुळे, इ. मुळवर्गीय पिके घेतली जातात. आणि फुलांचे - फळांचे उत्पादन घेतले जाते. अशा फुल उद्योग व भाजीपाला उद्योगांवरही मौर्य सरकार कर आकारणी करीत होते. त्याद्वारेही राजकोष भरला जात होता. फुलमळे, भाजीपाला मळ्यांवर जो कर आकारला जात होता त्याला 'सेतू' असे म्हणत.[१९]

**इ) वाणिक पथ :** मौर्यकाळात स्थल मार्ग आणि जलमार्ग असे दोन वणिक पथ होते. त्या व्यापारी मार्गावर सरकारचे नियंत्रण आणि संरक्षण होते. म्हणून या मार्गावरुन जाणाऱ्या व्यापारी व प्रवशांकडून जो कर घेतला जात होता. त्याला 'वाणिक पथ' कर असे म्हणतात.[२०]

**ई) वन कर :** मौर्यकाळात जंगलावर सरकारचा एकाधिकार होता. त्या जंगलातून मध, लाकुड, पशु, पक्षी इत्यादीचा व्यापार उद्योग चालत होता. अनेक औषधी वनस्पतींचा व्यापार ही चालत होता. जंगलाधारीत ह्या विविध उद्योगातून सरकारला 'वनकर' मिळत होता.[२१]

207

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



**उ) व्रज कर :** मौर्यकाळात गाय, घोडा, शेळ्या, मेंढ्या इ. अनेक पाळीव प्राणी लोकांच्याकडे होते त्या मानवोपायोगी प्राण्यांच्या पशुशाला होत्या त्यांच्या खरेदी-विक्रीवरही सरकार कर आकारीत होते तसेच त्या प्राण्यांना चरण्यासाठी ज्या गायरान जमिनी होत्या त्यांच्यावरही कर आकारले जात होते. त्या पशुच्या खरेदी-विक्री आणि चाराभुमिवर मोर्यसरकार 'व्रज' नावाचा कर आकारत होते.[२२]

**२) आय मुख :** कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र आयचे जे प्रमुख दोन भाग सांगितले होते. त्यापंकी पाहिला उपरोक्त आय शरीर हा आहे. तर दुसरा भाग आयमुख आहे. यातील कर प्रकार पुढीलप्रमाणे-

**अ) अत्यय आय :** मौर्यकाळात व्यपारी सामान खरेदी-विक्रीसाठी विशिष्ट जागा किंवा ठिकाण सरकारद्वारा निश्चीत करुन दिले होत होते. त्याच ठिकाणाहुन लोकांनी सामान खरेदी करावे असे होते. च्याशिवाय अन्य ठिकाणाहुन सामान खरेदी केल्यास त्या लोकांवर दंन्ड आकारला जात होता. त्याला 'अत्यय आय' असे म्हणतात.

**ब) मुल आय :** मौर्यकाळात सरकारद्वारा काही उद्योगधंदे चालविले जात होते. त्या सरकारी उद्योगधंद्यातून ज्या वस्तुंचे उत्पादन होत होते. त्या वस्तुच्या विक्रीतून सरकारला जी आय प्राप्त होत होती. त्याला 'मूल आय' म्हणतात.

**क) क्लिप्त आय :** नद्यांच्या कडेला, कालव्यांच्या कडेला, तसेच समुद्र किनाऱ्यावर वसलेल्या लोकांच्याकडून मौर्यसरकार कर घेत होती. कारण त्यातील पाण्याचा, पाण्यातील मासे इ. वापर किंवा व्यापार ते लोक करीत होते. म्हणून त्या लोकांना सरकारला हा 'क्लिप्त आय' कर द्यावा लागत होता.

**ड) भाग आय :** मोर्यकाळात व्यापाऱ्यांच्या श्रेणी संघटना होत्या. त्या श्रेणींच्याद्वारा जो व्यापार होत होता. त्यावर सरकारद्वारा कांही विशिष्ट रक्कम कर म्हणून निर्धारित करुन दिली जात होती. ती निर्धारीत कर रक्कम म्हणजेच 'भाग आय' होय.

**इ) व्याजी आय :** मौर्य सरकार त्यांना आवश्यक ते सामान बाजारातून खरेदी करीत होती. पण त्या सामानाची बाजारभावाप्रमाणे किंमत देत नव्हते म्हणजे त्या माल विकणाराचा त्या मालावरील नफा सरकारच घेवून जात होते. त्यालाच 'व्याजी आय' असे म्हणतात.

**ई) परिध आय :** हा सुदा एक विशिष्ट प्रकारचा कर होता.

**उ) रुपिक आय :** प्रजेकडून राजा कांही रक्कम घेवून राजकोषात जमा करीत होता. त्या नगदी रकमेला 'रुपिक आय' असे म्हणतात.[२३] अशा प्रकारे कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र ग्रंथात राजकोषाच्या भरणासाठी आय शरीर आणि आय मुख हे दोन प्रमुख मार्ग सांगितले त्या अंतर्गत पुन्हा आणखी अनेक उपकर प्रकारही सांगितले आहेत पण ह्या दोन विभागांव्यतिरिक्त आणखी काही इतरही आय प्रकार सांगितले आहेत ती पुढीलप्रमाणे.

२०८

Dist. Nanded



**३) इतर आय कर माध्यमे :** मौर्यकाळात न्यायालये सुद्धा सरकारच्या आय उत्पन्नाचे एक माध्यम होते. तसेच एखाद्या विशिष्ट प्रसंगी किंवा उत्सवाच्या वेळी राजाला प्रजाजन काही भेट देत होते त्याला 'उत्संग' असे म्हणतात. तोही राजकोषात जमा केला जात होता.[२४] मौर्यकाळात कधी-कधी संपूर्ण गावांवर एक खटच्या कर आकारला जात होता. तशा प्रकारच्या करास कौटिल्याने अर्थशास्त्र ग्रंथात 'पिन्डकर' असे म्हटले आहे.[२५]

मौर्यकाळात राजा भुमीकराच्या सोवतच जलकरही वसूल करीत होता. त्याला 'उदक भाग' असे म्हटले जात होते. कौटिल्याने अर्थशास्त्र ग्रंथात लिहीले की, नदी, तलाव, विहीरी याद्वारे वैयक्तीक सिंचन करुन शेती पिकविणाऱ्या शेतकऱ्याने राजाला उत्पन्नाचा पाचवा भाग द्यावा. जो शेतकरी आपल्या खांद्यावर पाणी आणून शेती पिकवितो त्याने आपल्या उत्पन्नाचा चौथा भाग द्यावा. तर सरकारी कालव्यातून सिंचन करुन शेती पिकविणाऱ्या शेतकऱ्यांने उत्पन्नाचा तिसरा हिस्सा राजाला का म्हणून द्यावा.[२६]

राज्यात जर युद्धाची स्थिती असेल किंवा कांही नैसर्गिक आपत्ती आली असेल आणि त्यामुळे राजाचा राजकोष बाधीत होत असेल तर तशावेळी राजा नवीन कर लावत व वसुल करीत असत. अशा आपत्ती कालीन कर प्रकारास 'प्रणय कर' असे म्हणत. म्हणजे राजाला अतिरिक्त धनराशी पाहिजे असेल तर राजा जनतेला प्रणयकर देण्यासाठी बाध्य करीत होता. तो शेतकरी, व्यापारी, शिल्पी आणि पशुपालकांकडून प्रणय कर वसुल करीत होता.[२७] सरकारच्या आपत्ती काळात सरकारला धन देणाऱ्या लोकांचा राजाच्या सभेत मान सन्मान केला जात होता. त्यांना राजसभेतील उच्च पद दिले जात होते. छत्र, पगडी, विविध उपाध्याही दिला जात होत्या. अशा आपत्तीकाळात मंदिरांकडूनही उपहार म्हणून धन घेतले जात होते.[२८]

अशाप्रकारे प्रजेकडून प्राप्त होणारे उपरोक्त विविध प्रकारचे कर गोळा करुन राजस्वात जमा केले जात होते. आणि त्याचा हिशोब राजस्व ठेवीत होता. त्या राजस्व विभागाचा प्रमुख 'समाहर्ता' हा होता. समाहर्ताला मदत करण्यासाठी शुल्काध्यक्ष, सुत्राध्यक्ष, सिताध्यक्ष, सुराध्यक्ष, गणिकाध्यक्ष, मुद्राध्यक्ष, अकाराध्यक्ष, पण्याध्यक्ष इत्यादी मदतनिस अधिकारीही होते. ह्या मदतनिस अधिकाऱ्यांनाही कांही मदतनीस होतेच जसे जिल्ह्याच्या स्तरावर असलेल्या राजस्व अधिकाऱ्यास 'युक्त' म्हणत होते. इत्यादी सर्व मंडळी राजाचा राजकोष भरणासाठी मदत करीत होती. आणि राजकोष भरभरुन ठेवण्याची त्यांची प्रमुख जबाबदारी होती. त्याच राजकोषाच्या आधारावर राजा आपली कर्तव्ये पार पाडत होता. लोकहिताची कामे करीत होता. व प्रजेला समाधानी सुखी ठेवण्याचे कार्य करीत होता.

२०९



संदर्भ सुची :

१) वशिष्ठ धर्मसुत्र, संपादक ए.ए. फ्युहरर, मुंबई - १९१६, भाग-१९, पृ.१४-१५.
२) कोटील्याचे अर्थशास्त्र, संपादक आर. शामशास्त्री, मेसूर १९०९, ५/२
३) Vedic Index, A.B. Keith, Macdonell AA, Vol-2, P.62
४) ऐतरेय ब्राह्मण, संपादक, टी.आफ्रेखट, वॉन, भाग-७ अध्याय २९
५) Vedic Age, R.C. Mujumdar, Bombay-1965 P. 437
६) Land Revenue - Za, P.8
७) बोधायन धर्मसुत्र - चौखंबा संस्कृत सिरीज, वाराणसी, १९३४, १/१०
वशिष्ठ धर्मसुत्र - संपादक, ए.ए. फ्युहरर, मुंबई - १९१६, १/४२
८) नारद स्मृती, संपादक, जे. जॉली, वाराणसी, १९६५, १८/४८
९) गौतम धर्मसुत्र, (इंग्रजी अनुवाद), जॉर्ज बुलर, भाग-२, वाराणसी-१९६५, पृ.३४-३५.
१०) आपस्तंब धर्मसुत्र, चौखंबा संस्कृत सिरीज, वाराणसी, १९६९. २/१०-१७
११) पुर्वोक्त - २, २/१
१२) उपरोक्त - २/१
१३) Giography - Strabo, 15/1/40
१४) रेव्हेन्यु सिस्टीम - घोपाल, पृ.१६८
१५) मौर्यन पब्लीक फायनेन्स, एच.एच. गोपाल, पृ.६८-७०.
१६) पुर्वोक्त - २, २/६
१७) उपरोक्त - २/६
१८) उपरोक्त - २/६
१९) उपरोक्त - २/६
२०) उपरोक्त - २/६
२१) उपरोक्त - २/६
२२) उपरोक्त - २/६
२३) उपरोक्त - २/६
२४) सोशल ॲण्ड रुरल इकॉनॉमी - अतीन्द्रनाथ बोस, पृ.१६८.
२५) अर्थशास्त्र २/१५
२६) उपरोक्त - २४, पृ.१७६
२७) पुर्वोक्त - २४, पृ.१७६
२८) अर्थशास्त्र ५/२

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded